स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या मानव विज्ञान विद्या शाखेअंतर्गत
अर्थशास्त्र विषयातील पी.एच.डी. पदवीसाठी सादर करण्यात
येणाऱ्या शोध प्रबंधाचा आराखडा

:: संशोधन विषय ::

"नांदेड जिल्हयातील इंदिरा आवास योजना व प्रधानमंत्री
आवास योजनेचा चिकित्सक अभ्यास"

:: संशोधक ::

मुळे नागनाथ हणमंतराव

:: मार्गदर्शक ::

प्रा.डॉ. विश्वनाथ गोविंदराव कंधारे
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर

:: संशोधन केंद्र ::

पीपल्स कॉलेज, नांदेड

::सन ::

२०२३

प्रस्तावना :-

इंदिरा आवास योजना १९८९ डिसेंबर १९९५ च्या अखेरपर्यंत जवाहर रोजगार योजनेतील उपाययोजना म्हणून राबविले जात होती. त्यानंतर दिनांक ०१/०१/१९९६ पासून ही योजना स्वतंत्रपणे केंद्र पुरस्कृत योजना म्हणून राबविण्यात येत आहे. या योजनेच्या निधीच्या उपलब्धतेची पध्दती केंद्र व राज्यात ७५:२५ प्रमाणे आहे.

या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील दार्रिदय रेषेखालील बेघर व कच्चे घर असलेल्या कुटुंबियांसाठी घरकुल बांधणेसाठी अनुदान देण्यात येत आहे. सदर योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी व्यक्तिचे नाव ग्रामसभेने मंजूर केलेल्या बेघर कुटुंबाची प्रतिक्षा यादी असणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार उपलब्ध निधीच्या ४० टक्के निधी बिगर अनुसूचित जाती जमातीसाठी राखून ठेवण्यात येतो आणि ६० टक्क् आरक्षीत ठेवला जातो.

त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना ज्याचे नाव २०१६ मध्ये इंदिरा आवास योजना काढुन प्रधान मंत्री आवास योजना ठेवण्यात आला आहे. बी.पी.एल. परिवारांना आर्थिक मदत ४५ हजाराहुन ७० हजार इतका देण्यात आला आहे. 'पी.एम.ए.वाय' दोन लाख कोटीच्या आर्थिक मदतीने २०२२ मध्ये शहरी व ग्रामीण भागात आर्थिक दृष्टया दुर्बल घटक कमी उत्पन्न धटाचा घरे बांधण्याचा प्रस्ताव करण्यात आला आहे.

संबंधित संदर्भिय साहित्याचा आढावा :-

प्रस्तुत संशोधन विषयाला अनुसरून राष्ट्रीय, राज्य व स्थानिक पातळीवरील पुर्वी झालेला संशोधन संदर्भिय साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे. संदर्भिय साहित्याचा विविध संशोधकांनी केलेले संशोधन, शोध प्रबंध, लघुशोध प्रबंध, संशोधन लेख, मुलभूत ग्रंथ, शासकिय अहवाल, आदींचा आढावा संदर्भिय साहित्याच्या अनुषगाने करण्यात येणार आहे.

संशोधनाच्या अभ्यास क्षेत्राची निवड :-

१. नांदेड जिल्हयातील इंदिराव गांधी आवास व प्रधानमंत्री आवास या योजनेच्या संदर्भातील विशेष अभ्यास झालेला नाही यामुळे या संशोधनात निवड करण्यात आला आहे.

२. नांदेड जिल्हयातील या योजनेचे उद्दिष्टे ठरविलेल्या कालखंडात पुर्ण झालेले नाही त्यामुळे या कारणाचा शोध घेणे हा संशोधनाचा मुख्य हेतू आहे.

विषयाचे महत्व :-

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये मोठया प्रमाणात होणाऱ्या लोकसंख्या वाढीमुळे घराची कमतरता आणि वाईट राहणीमान तसेच जास्त प्रमाणात युवक असल्यामुळे हे एक भारत सरकारला प्रमुख आवाहन आहे. मानवाची गरज निवारा घर महत्वाचा आहे. तसेच लोकसंख्या वाढ व वाढत्या नागरीकरणामुळे जागेचे तसेच निवाऱ्याची गरज मोठे आवाहन म्हणून पाहिले जाते, त्यामुळे नांदेड जिल्हयातील इंदिरा गांधी आणि प्रधानमंत्री आवास योजनेचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या दृष्टकोनाने निवड करण्यात आला आहे.

तसेच प्रस्तुत अभ्यासामध्ये नांदेड जिल्हयातील इंदिरा गांधी व प्रधानमंत्री आवास योजनेतील त्रूटी दूर करून ही योजना अधिक प्रभावीप्रमाणे राबविण्याच्या दृष्टीने शासनाला मार्गदर्शन मिळेल.

संशोधनाची उद्दिष्टे :-

१. इंदिरा गांधी आवास व प्रधानमंत्री आवास योजनेचा अभ्यास करणे.

२. नांदेड जिल्हयातील इंदिरा गांधी व प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुलचे काम पुर्ण झाले की नाही या संबंधी अभ्यास करणे.

३. नांदेड जिल्हयातील इंदिरा व गांधी व प्रधान मंत्री आवास योजनेचा तालुकानिहाय अध्ययन करणे.

४. नांदेड जिल्हयातील इंदिरा गांधी व प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंतर्गत कार्याचा अभ्यास करणे तसेच या योजनेच्या विकासातील सरकाराची भुमिका अभ्यासणे.

५. नांदेड जिल्हयातील इंदिरा गांधी व प्रधानमंत्री आवास योजनेच्या समस्येचा अभ्यास करून शिफारशी सुचविणे.

संशोधनाची गृहीतके :-

१. नांदेड जिल्हयातील इंदिरा गांधी व प्रधानमंत्री आवास योजनेच्या अनुदानात लाभार्थ्यांचे घरकुलांचे काही प्रमाणात काम पुर्ण होते.

२. नांदेड जिल्हयातील इंदिरा गांधी व प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना वित्तीय सहाय्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही.

३. नांदेड जिल्हयातील इंदिरा गांधी व प्रधानमंत्री योजनेचा अंतरजिल्हा असमानता दिसून येते.

४. नांदेड जिल्हयातून इंदिरा गांधी व प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत शहरी व ग्रामीण भागात घरे उपलब्ध करून देण्यामध्ये ही योजना यशस्वी ठरली.

संशोधन पध्दती :-

नांदेड जिल्हयातील इंदिरा गांधी व प्रधानमंत्री योजनेचा चिकित्सक अभ्यास हा प्रस्तुत संशोधन विषय सामाजिक व आर्थिक असल्यामुळे संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी सामाजिक संशोधन पध्दती, सर्वेक्षण पध्दती, विश्लेषणात्मक पध्दती अवलंब करण्यात येणार असून नमुना निवडीसाठी यादृच्छिक नमुना निवड पध्दत व हेतुपुरस्पर नमूना निवड पध्दतीच्या सहाय्याने नमुना आणि तालुक्याचा निवड करण्यात आला आहे. सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करून प्राप्त माहीती व आकडेवारी विश्लेशण करण्सासाठी सरासरी शेकडेवारीद्वारे वृध्दीदर सहसंबंध पडताळणी करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :-

प्राथमिक तथ्य संकलनासाठी मुलाखत प्रश्नावलीत अनुसूचित इत्यादी सांकिकीच्या साधनांचा उपयोग करून प्रस्तुत संशोधन समस्या संदर्भात माहीती संकलीत करण्यात येणार आहे.

द्वितीय तथ्य सकलनासाठी प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने आर्थिक सर्वेक्षण अहवाल जिल्हा आर्थिक समायोजन यांचे विभिन्न वर्षाचे अहवाल, तहसिल आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याद्वारे प्रकाशित करण्यात आलेली पुस्तिका आणि दस्ताऐवज त्याचरोबर प्रस्तुत विषयातील संदर्भग्रंथ पुस्तके, नियतकालीके, वृत्तपत्रे, शोधनिबंध,आलेख, नियतकालीके, लेखन मासिके, पाक्षीके, साप्ताहीक, दैनंदिन वृत्तपत्रे, विभीन्न विभागातून तसेच भारत सरकार व महाराष्ट्र सरकार आणि नांदेड जिल्हयातील संकेत स्थळावर माहिती आहे.

तथ्याचे विश्लेषण :-

उपरोक्त प्रमाणे प्राथमिक आणि दुय्यम तथ्य सामुग्रीच्या आधारे संकलित करण्यात आलेल्या तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी विविध सांख्यिकीय तंत्रे, शेकडेवारी, वस्तु आलेख, स्तंभलेखन सरासरी, इत्यादींच्या आश्यकतेनुसार उपयोग करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाच्या मर्यादा :-

१. प्रस्तुत संशोधनात इंदिरा गांधी आवास योजना व प्रधान मंत्री आवास योजनेचा चिकित्सक अभ्यास नांदेड जिल्हा या विषयान्वये या योजनेच अध्ययन नांदेड जिल्हयापुरतेच मर्यादीत आहे.

२. प्राथमिक आधार सामुग्री संकलित करीत असताना मुलाखतीद्वारे अंदाजे माहीती सांगणे पुर्वग्रह दूषित असणे अशा काही मर्यादा पडू शकतात.

प्रकरणाची रूपरेषा :-

प्रकरण पहीले : प्रस्तावना व संशोधन पध्दती

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : नांदेड जिल्हा एक दृष्टीक्षेप

प्रकरण चौथे : इंदिरा गांधी व प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावा

प्रकरण पाचवे : नांदेड जिल्हयातील इंदिरा गांधी व प्रधानमंत्री आवास योजनेच्या संकलीत तथ्याचे विश्लेषण.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

संदर्भसूची :-

संदर्भ :-

१. डॉ. प्रदीप आगलावे जून २०२२ संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर

२. हरीष शुक्ला २००२ ग्रामसमाज किंवा सेवा विकास, प्रभात प्रकाशन

३. महाराष्ट्रीय आर्थिक पाहणी अहवाल महाराष्ट्र शासन

४. श्री रंजन कोळंबे जानेवारी २०१७ भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन

५.	भोसले आणि काटे भारतीय अर्थव्यवस्था फडके प्रकाशन पुणे.

६.	सी.आर. कोठारे २००४ न्यू एज इंटरनेशन लिमिटेउ न्यु दिल्ली.

७.	योजना मासिक मार्च २०२२.

८.	लोकराज्य मासिक २०२३.

९.	बोधनकर सु. आणि आलोनी व्ही. आणि कुलकर्णी १९९९ सामाजिक संशोधन पध्दती साईनाथ प्रकाशन नागपूर.

१०.	नियतकालीके निसार खान २०१९

११.	मिनल बोरड जून २०१९.

अहवाल :	जिल्हा सामाजिक व आर्थिक समाजाच्या नांदेड जिल्हा माहीती व प्रसारण मंत्रालय महाराष्ट्र सरकार

संकेत स्थळ : 1.	sarkariyojna.compmay2023

2.	nanded.gov.in

3.	hadesh.maharashtra.gov.in

4.	nanded.gov.inschememahayojna

5.	mahadesh.maharashtra.gov.in

6.	loksatta.com

7.	indiaatimes

:: मार्गदर्शक ::

प्रा.डॉ. विश्वनाथ गोविंदराव कंधारे

सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर

:: संशोधक ::

मुळे नागनाथ हणमंतराव